■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २८९ ■ सोमवार दि.७ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 289 ■ Monday Dt.7 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# भाजपाचे डॉ. लक्ष्मण जाधव व त्यांच्या पत्नीने सावकारकीच्या माध्यमातून घेतला एका व्यापाऱ्याचा बळी..!

## खाजगी सावकारामुळे माणसाला जगणं नको वाटायला लागलं, नरकाच्या यातना सहन कराव्या लागतात?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**बीड शहरात खाजगी सावकारकीचा विळखा, वसुलीसाठी डॉ.लक्ष्मण जाधव व यांच्या पत्नीने चालवलेल्या छळामुळे एकाचा मृत्यू?**

# तुझी बायको माझ्या घरी आणून सोड, सावकाराचे काळजाला घाव घालणारे बोल?

## खाजगी सावकारीची यंत्रणा शहरात मूठभर, सूत्रधार यांच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या पाहिजे?

- खाजगी सावकारी बाबतचे सामाजिक संघटनांचे सोयीस्कर मौन बरेच काही सांगून जाते?
- खाजगी सावकारांनी पोसलेले गुंड प्रवृत्तीच्या लोकांमुळे मानसिक तणावाखाली गोरगरिबांच्या आत्महत्या?
- आरोपीच्या विरोधात सुसाईट नोट सापडल्याने एकच खळबळ माजली; सात जणांविरुद्ध गुन्हा, तीनजण अटकेत?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात वाढत चाललेल्या पतसंस्था, सावकारांचं जाळं आणि होणाऱ्या फसवणुकीच्या अनेक घटना गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चेत आहेत. त्यातच आता एका कापड व्यावसायिकाने भयानक पाऊल उचललं आहे. सावकारी जाचाला कंटाळून सदरील व्यापाऱ्यानी आत्महत्या केली आहे. राम असाराम फटाले (वय ४२) असे आत्महत्या केलेल्या व्यापाऱ्याचे नाव असून, आत्महत्येपूर्वी त्याने चार पानी सुसाईड नोट ठेवली होती. या सुसाईड नोटमध्ये भाजप भटके विमुक्त आघाडीचे डॉ. लक्ष्मण जाधव यांच्या नावासह त्यांच्या पत्नीचाही उल्लेख करण्यात आलाय. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून याप्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तीन आरोपींना अटक देखील केली आहे. सावकाराने पत्नीला आपल्या घरी सोडण्याची धमकी दिली होती. पैसे देऊनही सतत जाच होत असल्याचे व्यापाऱ्याने अखेर टोकाचं पाऊल उचललं. पोलिसांनी सावकार आणि त्याच्या पत्नीसह सात जणांवर गुन्हा दाखल केला असून तीन आरोपींना अटक झाली आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे.



सदरील घटना ही काळीज पिळवटून टाकणारी एक दुर्दैवी घटना घडली आहे. सतत होणारा सावकारी जाच आणि त्याच सावकाराने पत्नीसंदर्भात दिलेली धमकी या सर्व गोष्टींना वैतागून कापड व्यावसायिकाने गळफास घेऊन आयुष्य संपवलं. धक्कादायक गोष्ट म्हणजे, उधार घेतलेले पैसे वेळेवर आणून देता येत नसतील, तर तुझी पत्नी माझ्या घरी आणून सोड, अशी भयानक धमकी सावकाराने त्या मृत व्यापाऱ्याला दिली होती. रामा दिलीपराव फटाले हे बीड शनिवार पेठ, काळा हनुमान ठाणा परिसरातील रहिवाशी आहेत. त्यांनी कपडा व्यवसायासाठी सावकाराकडून पैसे घेतले होते. पैसे वेळेवर न दिल्याने सावकार त्यांना वारंवार त्रास देत होता. या त्रासाला कंटाळून त्यांनी शेवटी गळफास घेत आपले जीवन संपवले आहे. आठवडी बाजारामध्ये जाऊन ते कपडे विक्री करत होते. कपडा व्यवसायासाठी त्यांनी सावकाराकडून पैसे घेतले होते. सावकाराला ते वेळेवर व्याज देत होते असं करूनही त्यांना



डॉ. लक्ष्मण जाधव (सावकार)

सेवा केली जात होती त्यांना नाद त्रास दिला जात होता. फटाले यांनी व्याजाची हप्ते चुकू नयेत म्हणून पतसंस्था आणि खाजगी सावकार अशा दोन्हीकडून कर्ज घेतलं होतं. महिन्याकाठी पाच सहा आठवडे बाजार फिरवून कपडे विकण्याच्या कमाईतून ते वेळेवर रकमेचा जुळवाजुळव करत होते. पण कोरोना नंतर धंदा बसला खर्च वाढला त्यामुळे व्याजही वाढत गेले तरीही त्यांनी जानेवारीत सावकाराच्या हातात शेवटच्या व्याजाची रोकड ठेवली. मात्र शनिवारी रात्री उशिरा पुन्हा एकदा पैशाची

▶ पान २ वर



# वैद्यनाथ विद्यालय एसआयटीच्या जाळ्यात...?

## रणजीत देशमुखची थेट एस.पी.नवनीत कॉवत यांच्याकडे बोगस शिक्षक भरतीची तक्रार

परळी । प्रतिनिधी

शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आधिवेशानात बोगस शिक्षक भरती घोटाळ्यावर SIT नेमण्याची घोषणा केली आहे. माघील काही दिवसापासून वैद्यनाथ विद्यालय परळी वै. हि शाळा बोगस शिक्षक भरती घोटाळ्यसाठी खूप चर्चेत आहे. या शाळेमध्ये १-२ नव्हे तर २० च्या जवळपास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बोगस रित्या भरण्यात आलेले आहे. जुन्या तारखेचे नियुक्त्या दाखवून व सह्या स्कॅन (SCAN) करून हे नियुक्त्या घेण्यात आलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर या बोगस कर्मचाऱ्यांनी थकीत वेतनच्या नावाखाली शासनाची आर्थिक फसवणूक रून लाखोचे थकीत वेतन उचलले आहे. काही शिक्षक तर शाळेत रुजू नसून पगार उचलतात. वारंवार तक्रार करून देखील शिक्षणाधिकारी व उपसंचालक कार्यालय या प्रकरणी कोणतीही दखल घ्ययला तय्यार नाहीत. मे २०१२ पासून शिक्षक भरतीवर बंदी असल्यामुळे या शिक्षकांच्य नियुक्त्या मे २०१२ पूर्वीच्या दाखविलेल्या





आहेत. खर तर हे सर्व शिक्षक २०१२ पासून शाळेत कार्यरत नाहीत त याचे हि पुरावे रणजीत रणजीत देशमुख यांनी बीड अधीक्षक कार्यालयात दाखल केले आहे. या आर्थिक घोटाळ्यातील संपूर्ण अधिकारी कर्मचारी, तत्कालीन संस्थाचालक, मुख्याध्यापक यांचे बँक खाते तपासण्यात यावे. हा घोटाळा पूर्व नियोजित व संगनमताने केलेला असल्याने यात सामाविष्ठ असलेल्या सर्वांवर मोक्का (MCOCA) अंतर्गत कार्यवाही करण्यात यावी. या आर्थिक घोटाळ्यात बनावट कागदपत्रे तय्यार करणे, बनावट स्वाक्षऱ्या करणे, बनावट शालार्थ खऊ तयार करणे, बनावट नियुक्ती पत्र देणे, बनावट मान्यता देणे, आर्थिक अनियमितता करणे, आर्थिक रक्कम स्वीकारणे (लाचलुचपत) या कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात यावा, तसेच प्रत्येक शिक्षकाचे खात्यावर जी रक्कम कोषागार कार्यालयाकडून जमा झाली आहे ती संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करणे, जो पर्यंत रक्कम वसूल होत नाही तो पर्यंत यात समाविष्ठ असलेले मुख्याध्यापक, तत्कालीन संस्था कार्यकारी मंडळ, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी, Pay Unit कार्यालय अधीक्षक व वेतन अधीक्षक व शिक्षण उप संचालक यांच्या मालमत्ता जप्त करण्यात याव्यात अशी लेखी तक्रार रणजीत देशमुख यांनी पोलीस अधीक्षक बीड यांच्याकडे केली आहे.

रणजीत देशमुख यांनी शिक्षण विभागाला वारंवार तक्रार करून देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. आता या सर्व गोष्टींना कंटाळून, वैद्यनाथ विद्यालयात झालेल्या बोगस शिक्षक भरतीची तक्रार दि. ०२.०७.२०२५ रोजी मा. पोलीस अधीक्षक कार्यालया बीड येथे केलेली आहे आणि वैद्यनाथ विद्यालयावर डखढ लावण्याची मागणी केली आहे. आता बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक

▶ पान २ वर

# लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे आगमन

## तलवाडाकरांचे स्वप्न पूर्ण, पहाटे बसवला अण्णाभाऊंचा पुतळा दिवसभर मेघराजाने केले स्वागत, गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामपंचायत समोर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागेवर पहाटे पाच वाजेच्या दरम्यान पूर्णाकृती पुतळा बसवण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी, नवीन बस स्टँड ग्राम पंचायत समोर ग्रामपंचायत रेकॉर्ड वर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे नियोजित जागा आहे. कित्येक वर्षां पासुन तलवाडाकराचे पूर्ण कृती पुतळ्याची मागणी होती. दिनांक सात जुलै रोजी पहाटे पाचच्या दरम्यान गावकऱ्यांच्या वतीने नियोजित जागेवर पुतळा उभारण्यात आला असून ही माहिती मिळताच तात्काळ सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर, उपनिरीक्षक स्वप्नील कोळी, उपनिरीक्षक कैलास अन्नलदास, बीट अंमलदार जावळे तात्काळ त्या ठिकाणी जाऊन पुढील कारवाईसाठी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून हा पुतळा पाहण्यासाठी तलवाडा तसेच परिसरातून मोठ्या प्रमाणात समाज बांधव येत असून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येत आहे.



# 'कोंबडं घ्या, पण जलजीवनचे पाणी द्या'; आष्टीत मनसेचे अनोखे आंदोलन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात जलजीवन मिशनमार्फत नळयोजनांची सुरू असलेली कामे गेल्या चार वर्षांपासून अर्धवट अवस्थेत असून कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च होऊनही नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. जलजीवनची अर्धवट कामे पूर्ण करून नागरिकांना पाणी मिळावे याकडे लक्ष वेधण्यासाठी मनसे शेतकरी सेनेचे कैलास दरेकर यांनी सोमवारी (दि. ७) पंचायत समिती कार्यालयात 'कोंबडं घ्या, पण जलजीवनचे पाणी द्या' हे अनोखे आंदोलन करण्यात आले.

जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महात्वाकांक्षी योजना आहे. आष्टी मतदारसंघातील आष्टी, पाटोदा व शिरूर कासार या तीन तालुक्यांतील गावांना कोट्यावधी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सततच्या दुष्काळी परिस्थितीने होरपळणार्या जनतेला विशेष करून महिला व वयोवृद्ध नागरिकांना या योजनेचा मोठा फायदा होणार असून भारत निर्माण योजना, स्वजलधारा योजना, जलस्वराज्य, राष्ट्रीय पेयजल योजना, मुख्यमंत्री पेयजल, योजना, प्रधानमंत्री पेयजल योजना यासारख्या विविध योजनांवर शेकडो कोटींचा निधी खर्च होऊनही अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमताने निकृष्ट कामांमुळे वर्षानुवर्षे डोक्यावर असलेला हंडा उतरण्यास तयार नाही.

जलजीवन मिशन योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यातील १७२ गावे, पाटोदा तालुक्यातील ९० गावे व शिरूर तालुक्यातीलही अनेक गावांत ही योजना राबविण्यासाठी निविदा प्रक्रिया पार पडून प्रत्यक्ष कामांना सुरवातही धुमधडाक्यात करण्यात आली आहे. मात्र, कंत्राटदार व अधिकार्यांच्या अभद्र युतीमुळे इतर राबविण्यात आलेल्या योजनांप्रमाणे या योजनेतही मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार करण्यात आले असून गेल्या चार वर्षांपासून जवळपास सर्वच योजना अर्धवट अवस्थेत ठेवून मागील योजनांप्रमाणे या योजनेतही भ्रष्टाचार करण्याचे मनसुबे कंत्राटदार व अधिकार्यांकडून बाळगले जात आहेत. आष्टी तालुक्यातील १७२ पैकी ४४ कामे तसेच पाटोदा तालुक्यातील ९० पैकी २७ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली व पाटोदा तालुक्यातील ५ कामांची यशस्वी चाचणी घेण्यात आली असल्याचे दाखविण्यात आले आहे. मात्र, अद्यापपावेतो कोणत्याही गावाला या योजनेमार्फत पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला नसल्याने ग्रामस्थांसाठी कोट्यावधी रूपयांची ही जलजीवन योजना मृगजळच ठरली असल्याचे दिसून येत आहे.

कार्यारंभ आदेशानंतर चार वर्षांचा कालावधी लोटूनही अद्याप या योजनेमार्फत सुरू असलेली कामे पूर्णत्वास गेलेली नसून मुदतवाढीचे प्रस्ताव थातूरमातूर कारणे दाखवून मोठ्या आर्थिक उलाढालीतून मंजूर करण्यात आलेले आहेत अथवा तशा हालचाली सुरू आहेत.

आष्टी मतदारसंघातील सर्वच कामांमध्ये निविदा प्रकिया राबविण्यापासून मोठ्या प्रमाणावर गोलमाल करण्यात आलेला आहे. एकाच कंत्राटदारांना २० ते २५ कामे देण्याचा महाप्रताप करण्यात आलेला आहे. अद्यापपावेतो ही योजनाही कागदोपत्रीच सुरू असून याचा नागरिकांना कोणताही लाभ झालेला नाही. त्यामुळे कार्यारंभ आदेशामध्ये कंत्राटदारांना घालून देण्यात आलेल्या अटी व शर्तीप्रमाणे कंत्राटदारांवर १० टक्के दंडात्मक कारवाई करण्यात येणे गरजेचे व आवश्यक आहे. कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करून त्यांना सहाय्य करणार्या अधिकार्यांवरही फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करावेत. यासह आष्टी तालुक्यातील जनतेला तातडीने जलजीवन योजनेचे पाणी नळाद्वारे मिळावे यासाठी सोमवारी (दि. ७) अनोखे आंदोलन करण्यात आले.

### पोतराजाच्या वेश; अन सुबुळ्याने वेधले लक्ष

दरम्यान, जलजीवन योजनेत आष्टी मतदारसंघात झालेल्या गैरप्रकारांकडे लक्ष वेधण्यासाठी कैलास दरेकर यांनी पोतराजाचा वेश परिधान करून आष्टी शहरातून हलगी, संबुळं व ताशाच्या गजरात सवाद्य मिरवणूक काढत पंचायत समितीमध्ये जावून अधिका–यांना आखाड महिन्यातील कोंबड्यांची भेट दिली. या आंदोलनाची चर्चा दिवसभर सुरू होती.



# अभंग गायनाने मनातील विकार दूर होतात : डॉ.दीपा क्षीरसागर

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद व बालरंगभूमी परिषदेच्या वतीने आषाढी एकदशीनिमित्त अभंगवाणी कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

संताची अभंगवाणी जनसामान्य वारकरी व विठ्ठल भक्तांना एकत्रित आणणारा संप्रदायिक मार्ग असून तो मनाला सुखकारक बनवतो त्यामुळे संतांची अभंगवाणी ही सर्वांच्याच मनाला भावून जातात. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा, बीड, बालरंगभूमी परिषद आणि सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालयाचा संगीत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार आषाढी एकादशी निमित्य बालगट व प्रौढगटाचा अभंगवाणी हा भक्ती संगीताचा गायणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे उद्घाटन अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर व प्रसिध्द् गायक भरत अण्णाा लोळगे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने तर उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, संगीत विभाग प्रमुख डॉ.राहुल सोनवणे, सुरेश साळुंके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी सर्व सहभागी कलावंतास प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. आषाढी एकादशी निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी देव माझा विठू सावळा हा अभंग गाऊन भक्तीमय वातावरण निर्माण केले.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी केले. यावेळी अबिर गुलाल उधळत रंग, वेदांत काजळे, अमृताहुनी नाम तुझे देवा शाकंभरी किरण सातभाई, माझा भाव तुझे चरणी सर्वज्ञ गंढाणे, मृण्यमयी आंधळकर कमोदिनी काय जाणे, स्वराली व देवकी नामदेव साळूंके कानडा राजा पंढरीचा, देव दिपक मुळे वेडा वेडा रे पंढरी, विशााख व्होरकटे तुझ्या विना वैकुंटाचा कारभार चालेना, निर्मयी सुलाखे खेळ मांडियाला वाळवंटी, पामुक्षणी रामदासी सदा नाम घोषा करू हरी कथा, मैत्रयी कुलकर्णी घागर घेऊन घागर घेऊन, राजलक्ष्मी शिंदे, नवलाची गोष्ट ऐक सखे बाई, वैष्णवी डोरले एकतारी संगीत तर प्रौढ गटातील भक्ती जायभाये भेटी लागे पंढरीनाथा, तुकाराम जाधव चलग सखे चलगे सखे पंढरीला, वासुदेव काजळे कृपा त्या पांडूरंगाची, प्रकाश गोरे विठू माऊली तु माऊली जगाची, आशा भारती विठ्ठल नामाची शाळा भरली, नीता जोशी बा विठ्ठला धाव पावरे, संगीता सपकाळ विठ्ठलाच्या पायी विठ झाली भाग्यवंत, विवेक काटे आली कोठून कानी टाळ मृदंगाची धुण, श्रीवल्लभ कासट मज सांग तू काय झाले तर कार्यक्रमाची सांगता सुरश्री भरतअण्णा लोळगे यांच्यां अबिर गुलाल उधळीत रंग या अभंगाने झाली. या कार्यक्रमाची साथ संगत वासुदेव काजळे सर, विकास जायभाये, चव्हाण सर, प्रा.सुरेश थोरात, पवन शिंदे, नामदेव साळूके आदींनी दिली. कार्यक्रमाचे निवेदन सुरेश साळूंके यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी मानले. सौ.के.एस.के. महाविद्यालयात संपन्न झालेल्या संतांची अभंगवाणी या कार्यक्रमास एकूण ३० बाल व प्रौढ गट गायकानी सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमासाठी स्नेहल पाठक, अनुराधा चिंचोलकर, मिलींद शिवणीकर, राहूल सोनवणे, दिपक जमधाडे, अमित गाडे, अनिता शिंदे, सुरेश साळूंके, दुष्यंता रामटेके, विजय राख, इंद्रजीत भांगे, पवन शिंदे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद व बालरंगभूमी परिषदेचे सदस्य आणि बीड शहरातील व पंचक्रोशीतील रसिक श्रोते आदी उपस्थित होते.

# दांडीबहाद्दर अधिकऱ्यांमुळे शेतकऱ्यांना त्रास

## मंडल अधिकारी व तलाठी नियुक्त गावात हजर राहत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी कोंडी

पात्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील महसूल विभागातील मंडल अधिकारी व तलाठी नियुक्त गावात हजर राहत नसल्याने शेतकर्यांची मोठी कोंडी होत आहे. शेतकर्यांना आपली कामे सोडून तलाठी कार्यालया समोर त्यांच्या येण्याची वाट पाहत दिवस काढावा लागत आहे. तरी ही ते न येता दांडी मारत असल्याने या दांडी बहाद्दर कर्मचार्यामुळे शेतकर्यांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. याकडे तहसीलदार,व जिल्हाधिकारी यासह वरिष्ठ लक्ष देणार का? असा संतप्त सवाल माजलगाव तालुक्यातील शेतकर्यांमधून विचारला जात आहे.

सध्या बहुतांश कर्मचारी नियुक्त ठिकाणी न येता बसूनच आपले कामकाज करत आहेत. यामध्ये महसूल खात्याचे कर्मचारी वर्गाचा सर्वात वरती नंबर आहे.गावात शासनाकडून तलाठी व सर्कल यांना नियुक्त गावे देण्यात आली आहेत. त्यांना त्यांची बसण्याची ठिकाणेही दिलेली आहेत. परंतु या सर्व गावात एकाही ठिकाणी शासनाने नेमून दिलेल्या वेळेत दररोज तलाठी किंवा सर्कल हजर नसतात. तलाठी सर्कल यांना शासनाने नियुक्त गावात आपली वेळ ठरवून दिली आहे.त्याप्रमाणे संबंधितांचे वेळापत्रक त्यांच्या नियुक्ती ठिकाणी असणे गरजेचे आहे. परंतु गावात त्यांची कामाची वेळ व कामाचे दर्शनी भागात वेळापत्रक असणे गरजेचे आहे.परंतु असे कोणतीही वेळापत्रक कोणत्याही तलाठी अथवा सर्कल कार्यालयात पहावयास मिळत नाही. त्यामुळे आपल्या कामकाजाला शेतीकामातून वेळ काढून शेतकरी जर महसूल कार्यालयात गेला तर त्या ठिकाणी तलाठी किंवा सर्कल भेटत नाहीत.

परिणामी शेतकर्यांना तलाठी यांच्या आगमनाची वाट पाहत बसावे लागते. तरीही तलाठी येत नसल्याने हाताखालचा कर्मचारी ताठरपणाने वागत शेतकर्यांची आडवणूक करून पिळवणूक करत असतो.आर्थिक त्यामुळे शेतकर्याला आपले काम करून घेण्यासाठी दुसरा पर्याय नसल्याने मागेल तेवढी रक्कम द्यावी लागते. शेतकर्यांना जागेवर व वेळेत सेवा देण्यासाठी ही कार्यालय आहेत. परंतु तालुक्यात मात्र वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचा वचक प्रशासनावर नसल्याने उलटा कारभार सुरू आहे. शासन शेतकर्याच्या दारी असे शासनाचे ब्रीद आहे. परंतु तालुक्यात मात्र शेतकर्यांनी शासन दारी यावे अशी उलटी गंगा वाहत येण्याचा प्रकार सुरू आहे. महसूल प्रशासनातील अधिकार्यांनी एखादा दुसरा दिवस तालुका जिल्हास्तरावर कामकाजात घालवला तर गैर नाही.



# बालग्राममध्ये आषाढी एकादशी निमित्त बालगोपालांची दिंडी

गेवराई । प्रतिनिधी

येथील बालग्राम परिवारातील बालगोपालांनी आषाढी एकादशी निमित्त वारकऱ्यांच्या वेशभूषेत दिंडी काढली. यावेळी विठू नामाच्या गजराने बालग्राम परिवार व परिसर दुमदुमला होता.

पालख्या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या सहारा अनाथालय तथा बालग्राम परिवारातील विद्यार्थ्यांना सर्व सण, उत्सवांचा परिचय व्हावा, आपल्या संस्कृतीशी त्यांची नाळ टिकून राहावी म्हणून सर्व उपक्रम साजरे केले जातात. रविवारी सर्व बालग्राम परिवाराने मोठ्या भक्तिभावाने आषाढी एकादशी व्रत केले. सकाळी बालगोपालांची वारकऱ्यांच्या वेशभूषेत मोठ्या हर्षोल्हासात दिंडी निघाली. दिंडी दरम्यान विद्यार्थ्यांनी विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल असा गजर केला. कोणी अभंग तर कोणी गवळण घेतली. विद्यार्थ्यांनी फुगडी आणि रिंगणाचाही आनंद घेतला. टाळ, मृदंग व चिपळ्यांनी यावेळी बाळग्रामचा परिसर दुमदुमून गेला होता. बालग्राम परिवाराचे संतोष गर्जे, अधीक्षक संदीप नेहे, काळजीवाहक नंदा पवार, धम्मपाल, गोपाल, सुवर्णा यांच्यासह बालग्राममधील सर्व सहकारी यांनी दिंडी सोहळ्यात सहभाग घेतला.

पंढरीचा विठुराया जसा लेकुरवाळा आहे तसा तो सर्वांचा आहे. जात, धर्म व पंथाच्या पलीकडे जाऊन सर्वांवर मायेची पखरण घालणारा आहे. सर्वसमावेशक आहे. मानवतेशी नातं सांगणारा आहे म्हणून येणाऱ्या पिढ्यांनी विठुरायाची वारी आत्मसात केली पाहिजे असे प्रतिपादन बालग्राम परिवाराचे सर्वेसर्वा संतोष गर्जे यांनी यावेळी केले.

# समीर काझी यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे मराठवाड्यातील वक्फ बोर्डाच्या भाडेकरूंना घरकुलाचा लाभ मिळणार

बीड । प्रतिनिधी



अल्पसंख्यांक समाजाच्या विकासाचा ध्यास असलेले राज्यमंत्री पदाचा दर्जा प्राप्त महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे तरुण, तडफदार अध्यक्ष समीर काझी यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे मराठवाड्यातील वक्फ बोर्डाच्या भाडेकरूंना शासनाच्या घरकुलाचा लाभ मिळणार आहे. घरकुलाच्या बांधकामासाठी लागणारे नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता कायदेशीर बाबी तपासून त्यावर मार्ग काढण्यासाठी वक्फ बोर्ड सर्वतोपरी सहकार्य करेल, असा विश्वास वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना.समीर काझी यांनी दिला.

याबाबत माहिती देताना वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना.समीर काझी म्हणाले की, मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यांमध्ये वक्फ मालमत्तेवरील तत्कालीन भाडेकरू व अतिक्रमणधारक यांचे अतिक्रमण नियमाकुल करणे तसेच त्यांना या जागेवर नवीन घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे हा विषय प्रलंबित आहे. परंतु सन २०१४ च्या लीज रूल प्रमाणे कायदेशीर तरतुदीनुसार एका तालुक्याचा किंवा जिल्ह्याचा नवे तर सबंध मराठवाड्यातील रहिवाशांचा हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महानगरपालिका व नगरपालिका यांनी या बाबत दिलेल्या प्रस्तावाचा वक्फ बोर्ड सकारात्मक विचार करेल, असा विश्वास वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना.समीर काझी यांनी दिल्यामुळे मराठवाड्यातील बोर्डाच्या जागेवरील भाडेकरूंना शासनाच्या घरकुलाचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. मागील अनेक वर्षांपूर्वीपासून अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाचे अनेक रहिवाशी वक्फ मालमत्तेवर भाडेकरू म्हणून राहत असून वर्षानुवर्षे ते या जागेवर वास्तव्यास आहेत, त्यांच्याकडे या वास्तव्याचे पुरावेही आहेत. वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना.समीर काझी यांच्या सहकार्याने हा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्यात येणार असून राज्याच्या अल्पसंख्यांक विभागाकडे पाठपुरावा करून बोर्डाच्या भाडेकरूंना घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी कायदेशीर मार्ग काढण्यात येणार आहे.

### समीर काझींच्या सकारात्मक भूमिकेचे समाजाकडून स्वागत

मराठवाड्यातील वक्फ बोर्डाच्या जागेवरील भाडेकरूंना शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे कर्तव्यदक्ष, कार्यक्षम व धडाडीचे अध्यक्ष ना.समीर काझी यांनी सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाकडून त्यांच्या या भूमिकेचे स्वागत केले जात आहे.

पान १ वरून...

### तुझी बायको माझ्या घरी आणून सोड, सावकाराचे काळजाला घाव घालणारे बोल?

मागणी व फोनवरून शिवीगाळ झाली. या त्रासाला कंटाळून शेवटी या कापड व्यापाऱ्याने आपले जीवन संपवले आहे. त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्यामुळे त्याचे आई–वडीव, पत्नी, मुलं आणि कुटुंबियांवर तर अक्षरश: दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

याप्रकरणी राम फटाले यांचे वडिल दिलीप फटाले यांनी पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदवली. त्यानुसार, पेठ बीड पोलीस ठाण्यात सावकार डॉ. लक्ष्मण जाधव आणि त्याच्या पत्नीसह एकूण सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघांना अटक करण्यात आली आहे, पोलिस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. मृत्यूपूर्वी राम यांनी चार पानी सुसाईड नोटही लिहून ठेवली होती.

### वैद्यनाथ विद्यालय एसआयटीच्या जाळ्यात...?

नवनीत कावंत या प्रकरणी कोणती कार्यवाही करतील यावर सगळ्यांचे लक्ष केंद्रित आहे. शाळेत शिक्षक रुजुच नाही आणि काढला पगार कणाके, गट शिक्षणाधिकारी पं.स. परळी यांची कृपा..!

संस्थेचे वाद असल्यामुळे सध्या वैद्यनाथ विद्यालयावर प्रशासक म्हणून, मुख्याध्यापक पदी वैद्यनाथ विद्यालयाचा काहीही अभ्यास नसणारे परळीचे गट शिक्षणाधिकारी कणाके यांच्याकडे आहे. संस्थेत वाद असल्याचा फायदा घेत कणाके यांनी मनमानी कारबार सुरु केला आहे. शाळेत कार्यरत नसलेल्या व रुजू नसलेल्या कर्मचाऱ्यांचे पगार ते काढत आहे व माहिती अधिकारात काही मागितल्यास उत्तर न देता दिशा भूल करत आहेत, आणि शासनाची आर्थिक करणाऱ्यांना वचविण्याचा काम परळी तालुका गटशिक्षणाधिकारी कणाके करत आहेत.

# पंढरपूर पालखी सोहळा देखावा: भक्ती आणि एकतेचा प्रवास

## अजय रुकर यांच्या घरी फुलला भक्तीचा मळा



गेवराई । प्रतिनिधी

पंढरपूर पालखी जुलै महिन्यात उत्सवादरम्यान पंढरपूरला जाणारा प्रवास हा भक्तीच्या चिरस्थायी भावनेचा एक उल्लेखनीय पुरावा असुन शेकडो किलोमीटरचा हा तीर्थयात्रा मार्ग देहू आणि आळंदी या शहरांपासून सुरू होतो, जिथे संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वरांच्या पालख्या फडकवल्या जातात. तिथून, वारकऱ्यांचा समुद्र महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेवटी पवित्र शहर पंढरपूर येथे एकत्र येतो. पिढ्यानपिढ्या चालणारा हा मार्ग भक्तीच्या गाण्यांनी आणि ताल मृदंगाच्या लयबद्ध तालांनी भरलेला आहे, ज्यामुळे आत्म्याला उन्नत करणारे एक मंत्रमुग्ध करणारे वातावरण निर्माण होते.या पवित्र यात्रेची तयारी महिने आधीच सुरू होते, ज्यामध्ये भाविक आध्यात्मिक साधना आणि शारीरिक आरोग्यामध्ये गुंततात. अनेक वारकरी यात्रेसाठी स्वत:ला आध्यात्मिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी उपवास करतात आणि नियमित सत्संगात सहभागी होतात. समुदाय एकत्र येऊन मार्गावर अन्न आणि पाणी पुरवठा, वैद्यकीय शिबिरे आणि विश्रांतीसाठी निवारा आयोजित करतात, जेणेकरून सर्व यात्रेकरूंच्या गरजा पूर्ण होतील याची खात्री आहे. याच आधारावर पंढरपूरच्या दिशेने वारकरी रवाना होतात असा अनुभवी देखावा सादरीकरण करण्यात आला.

सविस्तर वृत्त असे की आषाढी एकादशी निमित्त वारकऱ्यांचा मेळावा म्हणून आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करत असतानाचा प्रसंगाचा देखावा गेवराई शहरातील मेन रोड या भागातील रहिवासी असलेले अजय रुकर यांनी पंढरपूर पालखी सोहळा देखावा: भक्ती आणि एकतेचा प्रवास हा देखावा सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत यांच्या घरी फुलला भक्तीचा मळा असे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे त्यामुळे पंढरपूरच्या दिशेने वारकरी संप्रदाय टाळ मृदंगाच्या व अभंगाच्या जयघोषनेने रवाना होत असल्याचा देखावा सादर केल्याने भाविकांच्या अलोट गर्दीच्या चैतन्याने रुकर यांच्या निवासस्थानी उसळलेल्या मित्र मंडळ व महिलांच्या गर्दीने बहरलेला भक्तीचा मळा फुलून दिसत होता असे या देखाव्यातून दाखविण्यात आले आहे. देखावा विविधरंगी प्रकाशझोतात लक्ष वेधून घेत आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विमान उड्डाण लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.ढवळे

## पालकमंत्री अजितदादा, बीडच्या विमानतळाईतकीच जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या धोकादायक शाळांची काळजी घ्या

बीड । प्रतिनिधी

बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी मंजुर केलेल्या बीड जिल्हा विकासाचा ७७५ कोटी रुपयांचा आराखडा असताना आतापर्यंत केवळ ४० लाख रुपये निधी उपलब्ध झाले असुन हा निधी बीडच्या प्रस्तावित विमानतळाच्या जागेच्या पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. दुसरीकडे बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था असुन मोडकळीस आलेल्या शाळांचे भिंती, छप्पर कोसळुन विद्यार्थी जखमी होण्याच्या घटना घडत आहेत.




गेल्या आठवड्यात पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची भिंत रात्री कोसळल्याने दुर्घटना घडली नाही परंतु धारूर तालुक्यातील घागरवाडा येथील छताच्या भाग डोक्यात कोसळुन विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधांची विमानतळापेक्षा जास्त आवश्यकता असुन पालकमंत्री अजितदादा पवार यांनी विमानतळासाठी जेवढी काळजी करत आहेत तेवढीच काळजी या मोडकळीस आलेल्या धोकादायक शाळांमधील विद्यार्थ्यांची घेऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.७ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कागदी विमान उडवत विमान उड्डाण लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड, शेख युनुस, सुदाम तांदळे, मुबीन शेख, शिवशर्मा शेलार, शेख मुस्ताक, माजी सैनिक अशोक येडे बीड जिल्हाध्यक्ष आप, रामधन ज्या बीड जिल्हाध्यक्ष (इंटक) आदी सहभागी होते. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन दिले.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २४७६ शाळा असुन ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या धोकादायक मोडकळीस आलेल्या असुन त्याठिकाणी अध्यापन करण्यात येऊ नये अशा शिक्षण विभागाने कळविले आहे. तर ७४९ वर्गखोल्यांची किरकोळ दुरुस्ती आणि ८५६ वर्गखोल्यांची मोठ्या दुरुस्तीची गरज आहे. तर ७८० शाळांमध्ये वीजपुरवठा नसल्याने डिजिटल शिक्षणाचा खेळ खंडोबा झाला आहे. उघड्यावर भरणाऱ्या, झाडाखाली, पत्र्यांच्या शेडमध्ये, किरायाच्या रूममध्ये भरणाऱ्या शाळा, पावसाळ्यात गळक्या ईमारती, दारे खिडक्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधांची वानवा आहे.

### ५५ कोटींचा प्रस्ताव २ वर्षांपासून धुळखात पडुन

५४१ वर्गखोल्यांच्या मोठ्या दुरुस्ती करीता १३ कोटी १४ लाख ६३ हजार रूपयांचा निधी आणि ५१९ धोकादायक वर्ग खोल्यांच्या बांधकाम व पत्र्यांच्या शेडमध्ये भरणाऱ्या ३८ शाळांमधील ३८ वर्गखोल्या बांधकामासाठी असे एकुण ५५ कोटी ७० लाख रुपये निधी मिळण्यासाठी प्रशासनाकडून २ वर्षांपासून प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. मात्र याकडे शासनाचे दुर्लक्ष असुन निधी देण्यात हात आखडता घेतला जात असल्याचे वास्तव दुर्दैवी आहे.



# तिरुपती हॉस्पिटल च्या वतीने भाविकांना फराळ वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ तथा अस्थीरोग तज्ञ डॉ. बालाजी नवले यांच्या नव्याने सुरू झालेले तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि मनका विकार विभाग नगर नाका बीडच्या वतीने देवशयानी आषाढी एकादशीनिमित्त बीड येथील भाविकांना सोमेश्वर मंदिर बार्शी रोड बीड येथे फराळ वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. सोमेश्वर मंदिर बार्शी रोड बीड येथे डॉ. बालाजी नवले यांच्या वतीने साबुदाणा खिचडी आणि केळी वाटप करून वारकरी परंपरा जपण्याचा प्रयत्न केला.

या कार्यक्रमाला उपस्थित डॉ. बालाजी नवले तसेच तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथील सर्व कर्मचारी उपस्थित होते. तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल हे एक मनका विकारावर उपयुक्त असे सुसज्ज सर्व उपक्रमाने अधिकृत विभाग आहे. या ठिकाणी मन त्याच्या सर्व आजारावर उपचार मार्गदर्शन केले जातात तसेच सायटिका स्लिप डिस्क मणक्यात गॅप असणे, स्पॉंडिलेसिस, मनका फ्रॅक्चर, लहान मुलांमध्ये असणारे मणक्याचे आजार तसेच तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये दुर्बीण द्वारे मणक्याचे ऑपरेशन केले जाते.

तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ तथा अस्थिरोग तज्ञ डॉ. बालाजी नवले यांनी आजपर्यंत हजारो मणक्याच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडले आहेत. हॉस्पिटलचा पत्ता नगर नाका लाईफ लाईन हॉस्पिटल समोर बीड आहे. तरीही गरजू रुग्णांनी भेटीसाठी संपर्क ७७७०००३२२९, ८६६८२१२२३१ करण्याचे आवाहन तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.



# ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात संत वारकरी दिंडी उत्सव उत्साहात साजरा

धारूर । प्रतिनिधी

ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेला संत वारकरी दिंडी उत्सव – २०२५ भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. या दिंडीत बालचिमुकल्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत मुक्ताबाई, संत जनाबाई आणि श्री विठ्ठल–रुक्मिणी यांच्या वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या सादरीकरणात भक्ती, समर्पण आणि सांस्कृतिक जाण प्रकर्षाने दिसून आली. दिंडीची सुरुवात विद्यालयातून झाली. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे विठ्ठल–रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते पार पडले. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी हरीनामाच्या गजरात फुगडी व पहिले रिंगण सादर करत वातावरण भक्तिमय केले.

यानंतर दिंडी हनुमान चौक येथे पोहोचली, जिथे दुसरे रिंगण पार पडले. तसेच फुगडी, लेझीम, लाठी–काठी, झेंडा–पताका अशा विविध पारंपरिक कलांचे विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले. या कार्यक्रमामुळे संपूर्ण शहरात भक्तीरसाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पालखी दिंडी मार्गस्थ झाल्यानंतर संपूर्ण शहर हरीनामाच्या घोषाने दुमदुमून गेले. शेवटी हा वारकरी दिंडी सोहळा अत्यंत उत्साहात, भक्तिभावात व आनंदात संपन्न झाला. या कार्यक्रमात पालक, नागरिक, शिक्षक, विदयार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांचे आभार मानण्यात आले.

# आषाढीनिमित्त जिजाऊ पब्लिक स्कुलमध्ये दिंडी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथील जिजाऊ पब्लिक स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्कूलच्या अध्यक्षा आश्विनी सोजे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रथम विठ्ठल रुक्मिणीची पूजा आश्विनी सोजे यांच्या हस्ते करण्यात आली, त्यानंतर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कला प्रकाराचे पालकांनी कौतुक केले. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांची पायी दिंडी काढण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या सहशिक्षिका चोरमले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षिका व शिक्षकेत्तर यांनी परिश्रम घेतले.



# राजेंद्र घोडके यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी : माजी आ.ठोंबरे

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा गुणवंत विद्यार्थी व सेवापुर्ती सोहळा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर येथील सेवानिवृत्त आरेखक तथा खानापूर येथील रहिवाशी राजेंद्र घोडके हे समाजातील गरजवंतांना सातत्याने मदत करत असतात. समाजातील अनेक मुला मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी सहकार्य केलेले आहे. कोरोना काळात त्यांचे काम उल्लेखनीय होते. म्हणून राजेंद्र घोडके यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत केजच्या माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय चर्मकार महासंघ माजलगाव यांच्या वतीने राजेंद्र घोडके यांचा सेवापूर्ती गौरव, गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन संत रविदास सभागृह माजलगाव येथे रविवार दि.६ रोजी करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षपदावरून प्रा.ठोंबरे बोलत होत्या.

सर्व महापुरुषांच्या एकत्रित प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वागतगीत अशोक वाडेकर यांनी गायले. यावेळी व्यासपीठावर तुलसी शैक्षणिक समूह बीडचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस दयानंद स्वामी, सत्कारमूर्ती अरेखक राजेंद्र घोडके, सत्वशीला घोडके, वंचित बहुजन आघाडीचे नेते धमानंद साळवे, जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, कर्मचारी जिल्हाध्यक्ष सुनील माने, वडवणी तालुका अध्यक्ष मधुकर ठोसर, भारतीय बौद्ध महासभेचे काशिनाथराव साळवे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. प्रदीप रोडे बोलताना म्हणाले की,



मुलींचे शिक्षण ही काळाची गरज असून त्यासाठी पालकांनी मुलींना शिकवावे. धनवंत होण्यापेक्षा गुणवंत होण्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे.

सत्काराला उत्तर देताना राजेंद्र घोडके बोलताना म्हणाले, माझी कर्मभूमी अंबाजोगाई असली तरी माझी जन्मभूमी माजलगाव आहे आणि माजलगाव करांनी केलेला सत्कार हा मी कधीही विसरू शकणार नाही. मी आजपर्यंत महापुरुषांचे विचार माझ्या जीवनात अमलात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि तोच प्रयत्न भविष्यकाळात ही राहील. त्यांच्या विचारांना कधीही तडा जाऊ देणार नाही असे काम मी करील अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी दयानंद स्वामी, धमानंद साळवे यांची समायोजित भाषणे झाली. याप्रसंगी दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी केले. सूत्रसंचालन माजी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे यांनी मानले.

यावेळी संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष तुकाराम नावडकर, महिला आघाडी तालुकाध्यक्ष ज्योती वाघमारे, वंदनाताई वाघमोडे, रमेश जगताप, राधाकिसन भाळशंकर, मोहन त्रिमुखे, अनिल खंडागळे, शिवाजी गायकवाड, डॉ.गोरख फसले, चर्मकार उठाव जिल्हाध्यक्ष सचिन कांबळे, भागवत जाधव, रामभाऊ उदमले, अरविंद खंडागळे, वसंत वाघमारे, भीमराव गायकवाड, तुकाराम जगधने यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, माजी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर, पद्माकर कांबळे, योगेश शिंदे, अशोक कांबळे, संतोष जाधव, विष्णू गवळी, सचिन वाघमारे, अर्जुन पोहेकर यांनी परिश्रम घेतले.



## उभा कसा राहिला विटेवरी पंढरीचा विठ्ठल कुणी पाहिला

चौसाळा येथील आषाढी एकादशीनिमित्त परदेशी परिवारातील छोट्या बालगोपालांनी वारकरी संप्रदायाची परंपरा जपत पारंपारिक वेशभूषा परिधान केले होते.

# खासदार बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त घाटनांदूर येथे विविध उपक्रमांचे आयोजन

घाटनांदूर । प्रतिनिधी

खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत घाटनांदूर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन राजकमल आबासाहेब देशमुख यांच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच गुरुदास सेवा वृद्धाश्रमातील वृद्धांना फळांचे वितरण करून सामाजिक आपुलकी व्यक्त करण्यात आली.

सर्वश्रेष्ठ दान रक्तदान या संकल्पनेनुसार रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले. या शिबिराला तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सर्व उपक्रमांमधून खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या सामाजिक जाणीवेचा आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीचा प्रत्यय आला. यावेळी ॲड.माधव जाधव, सोपानराव तोंडे, बाबाजी शिंदे, उत्तम माने, धनंजय जाधव, भागवत जाधव, भास्कर पाटील, बाळासाहेब देशमुख, अतुल देशमुख, उमाकांत जाधव, मुत्कार शेख, उमर शेख, कमलाकर मिसाळ, शरद जाधव, सचिन जाधव, विनय जाधव, गणेश जाधव, सिद्धेश्वर जाधव, चिन्मय देशमुख, विश्वजीत डाके यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# शहर बचाव मंचच्या वतीने परवेज कुरेशी व गणेश बजगुडे यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

बीड शहर बचाव मंच, जि.इंटक काँग्रेस कमिटी, लेक लाडकी अभियान समिती, बीड शहर बचाव मंचचे संचालक नितीन जायभाये, रामधन जमाले, बाजीराव ढाकणे यांनी राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या बीड तालुका अध्यक्षपदी गणेश बजगुडे तसेच बीड शहराध्यक्षपदी परवेज कुरैशी यांची फेरनियुक्ती झाल्याबद्दल हॉटेल अन्विता येथे सत्कार केला यावेळी भैय्या गोरे, हनुमंत घोडके आदी सहकारी उपस्थित होते. त्यांच्या फेरी निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.



# शेवटच्या श्वासापर्यंत निळ्या झेंड्याखाली समाजाची सेवा करणार : रामदादा किरवले

सिरसाळा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात व परळी तालुका रिपब्लिकन चळवळीत आग्रेसर चर्चेत नाव आघाडीवर असलेले नेतृत्व म्हनजे राम किरवले. परिवर्तन घडवण्यासाठी काही माणसं निसर्गच बनवतो. अशा व्यक्तींमध्ये राम दादा किरवले यांचा अभिमानाने उल्लेख करावा लागतो. सिरसाळा गावातील या लढवय्या नेतृत्वाने केवळ आपल्या गावापुरता नव्हे, तर मराठवाड्यातील दलित समाजाच्या अस्मितेसाठी, हक्कासाठी आणि न्यायासाठी अपार संघर्ष केला. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेल्या संविधानिक मार्गावरून चळवळ पुढे नेण्याचे काम राम दादांनी आपले जीवन समर्पित करून केले. जीवन प्रवास आणि सामाजिक भानराम किरवले यांचे बालपण साध्या घरात गेले, परंतु लहानपणापासूनच बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनात खोलवर रुजला. जातीभेद, विषमता, आणि अन्याय या गोष्टींचा त्यांनी स्वत: अनुभव घेतला आणि म्हणूनच समाज बदलायला हवा, या जाणीवेने त्यांना लहानवयातच कार्यकर्ते बनवले.

त्यांनी सतत लोकांमध्ये मिसळून, त्यांच्या अडचणी



समजून घेतल्या. शिक्षण, आत्मसन्मान आणि संघटन यावर त्यांनी कायम भर दिला. सामाजिक परिवर्तनाची सुरुवात स्वत:पासून होते. या तत्त्वाला धरून त्यांनी आपले वर्तन व आचरण कायम पारदर्शक ठेवले.

### नामांतर लढा – दलित अस्मितेचा इतिहास

१९७८ पासून सुरू झालेला औरंगाबाद विद्यापीठ नामांतर आंदोलन ही महाराष्ट्राच्या दलित चळवळीतील महत्त्वाची घटना होती. या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नाव मिळावे, ही मागणी केवळ एक नाव बदलण्याची नव्हती तर दलित समाजाच्या हजारो वर्षांच्या संघर्षाचा, आत्मसन्मानाचा आणि ओळखीचा सन्मान करण्याची मागणी होती. रामदादा किरवले यांनी या चळवळीत आघाडीचे नेतृत्व केले.

गावोगावी सभा, प्रचारमोहीम विद्यार्थी संघटना, युवक संघटनांना एकत्र करणे, शासकीय स्तरावर पाठपुरावा, लोकांमध्ये जागृती हे सगळे त्यांनी सातत्याने आणि निष्ठेने केले. या आंदोलनात झालेला हिंसाचार, पोलिसी दडपशाही, दलित कार्यकर्त्यांवरचे खोटे गुन्हे या सगळ्याला धैर्याने तोंड देत त्यांनी हा लढा चालू ठेवला. राम दादांचे नेतृत्व आणि प्रेरक भाषणे अनेकांना चळवळीत पुन्हा उभे राहण्यासाठी बळ देत होते. बाबासाहेबांचे नाव हे केवळ नाव नाही, ते आपला आत्मसन्मान आहे. हा संदेश त्यांनी प्रत्येक सभा, मोर्च्यातून दिला. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे नाव लाभले, ते अनेक कार्यकर्त्यांच्या रक्त, घाम, संघर्षातून शक्य झाले. यात राम दादा किरवले. यांचा मोलाचा वाटा कायम स्मरणात राहील. गावातील नेतृत्व सिरसाळा गावाचा चेहरा बदलणारे सरपंच राम किरवले यांनी सिरसाळा गावचे सरपंच म्हणून जबाबदारी स्वीकारली तेव्हा गावात अनेक समस्या होत्या.



बीड – राष्ट्रवादी काँग्रेस नेते शेख निजाम भाई हे पवित्र हज यात्रेहून परत आले असता त्यानिमित्त त्यांना भेटून शुभेच्छा देताना भाजपाचे नेते शेख इर्शाद, फहीम इनामदार.

# अखेर लेकीच्या मदतीला अमरसिंह पंडित धावुन आले!

## माजी आ.अमरसिंह पंडित व विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या युक्तीने डाव उधळला! सरपंच शितल साखरे यांना चक्रव्यूहात अडकवण्याचा डाव फसला, पुन्हा सरपंच पदावर कायम कार्यरत राहणार

## अखेर विक्रमादित्य यश मिळवत आलेल्या संकटावर मात? सदस्यांचा अविश्वास फेटाळला

### सर्व सदस्य बैठकीला गैरहजर : तहसीलदार संदीप खोमणे देणार पुनर्नियुक्त सरपंच शितल साखरे यांना संधी?

गेवराई । प्रतिनिधी

धोंडराईच्या सरपंचांविरोधातील अविश्वास ठराव मांडला असता सर्वच सदस्य विशेष सभेला गैरहजर राहिल्याने फेटाळण्यात आला. विशेष म्हणजे सभेला ज्या सदस्यांनी अविश्वासाचा ठराव मांडला होता ते सदस्यही बैठकीस अनुपिस्थत होते. धोंडराई ग्रामपंचायतीच्या सरपंच कु. शितल अशोक साखरे यांच्या विरोधात १७ सदस्यांपैकी १३ सदस्यांनी तहसीलदारांकडे दि. २ जुलै रोजी अविश्वासाचा ठराव दाखल केला होता. यामुळे बहुमताने हा ठराव पारित होणार असा विश्वास सर्वांना होता. मात्र दि.७ जुलै रोजी तहसीलदार संदीप खोमणे यांच्या अध्यक्षतेखाली ११ वाजता विशेष सभा बोलाविण्यात आली होती. मात्र सर्वच सभासद गैरहजर राहिल्याने सदस्यायांनी दाखल केलेला अविश्वासाचा ठराव फेटाळण्यात आला. विशेष सभेला सदस्य गैरहजर असल्याचे बघून अनुपस्थित तहसील प्रशासनाच्या वतीने विशेष सभेला सर्वच सदस्य गैरहजर राहिल्याने तहसीलदार संदीप खोमणे यांनी विद्यमान सरपंच कु.शितल अशोक साखरे यांच्या विरोधात महाराष्ट्र



ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ३५ व मुंबई ग्रामपंचायत नियम १९७५ मधील तरतुदीनुसार दाखल झालेला ठराव फेटाळण्यात आल्याचे जाहीर केले. विशेष सभेला ग्रामसेवक सोपान मुसळे उपस्थित होते.

सविस्तर वृत्त असे की, सदस्यच अनुपस्थित राहिल्याने हा ठराव आणणाऱ्यांना चांगलीच चपराक बसली आहे. सदस्यांचे मन परिवर्तन करण्यात यश मिळवल्याने सरपंच पदाचा मार्ग मोकळा झाला आहे. गावकऱ्यांच्या मनोबलाने आणि काही प्रमुख सदस्यांच्या ठाम भूमिकेमुळे अखेर सरपंच यांच्याविरोधातील अविश्वास प्रस्ताव फेटाळण्यात यश आले.

तहसीलदार संदीप खोमणे यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या विशेष ग्रामसभेत एकमताने कु.शितल अशोक साखरे यांच्याच बाजूने ठराव मंजूर करण्यात आला. कु.शितल अशोक साखरे यांना पदावरून हटवण्यासाठी रचण्यात आलेल्या चक्रव्यूहात काहींनी त्यांना अडकवण्याचा प्रयत्न केला होता, मात्र तो डाव फसला. यामागे विक्रमादित्य यांची काटेकोर रणनीती आणि

**शेवटी सत्याचा विजय झाला : शितल साखरे**

माझ्यावर अविश्वास ठराव आणण्यासाठी अनेक मोठे पुढारी कार्यरत होते. माझ्या विरोधात ठरावाच्या बाजूने मतदान करण्यासाठी माझ्या अन्य सदस्य सहकाऱ्यांना खोटी माहिती दिली गेली. त्यांना विश्वासात घेतले गेले नाही. अशी चर्चा वाऱ्यांच्या वेगासारखी पसरलेली परंतु माझे नेते अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित त्यांच्या कृपाशीर्वादाने शेवटी सत्याचा विजय झाला आणि माझ्यावरील अविश्वास ठराव फेटाळला गेला.

– **शितल अशोक साखरे,** सरपंच, धोंडराई (ता.गेवराई जि.बीड)

अखेरच्या क्षणी धावून आलेल्या माजी आमदार अमरसिंह पंडित यांची साथ लेकीला निर्णायक ठरली. ग्रामसभा अतिशय तणावपूर्ण वातावरणात पार पडली. विरोधकांनी जोरदार प्रयत्न केले असले तरी, ग्रामपंचायतीतील बहुसंख्य सदस्यांनी विश्वासाने सरपंच शितल साखरे यांच्यावरच विश्वास व्यक्त केला. या निर्णयामुळे गावात पुन्हा एकदा स्थिरता येण्याची शक्यता असून, विकासकामांना वेग मिळेल, अशी आशा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. सरपंच साखरे यांच्या बाजूने निकाल जाहीर होताच जल्लोष साजरा करण्यात आला.

## बळीराजाच्या व्यथा मांडण्यासाठी शेतकरी सहदेव होनाळे यांची खांद्यावर नांगर घेऊन विधानभवनाकडे पायी दिंडी

लिंबागणेश । प्रतिनिधी

गेल्या आठवड्यात डोक्यावर कर्जाचा बोजा, कोळपणीसाठी पैसे नसल्याने स्वतःच्या खांद्यावर जोखड घेऊन शेती कसण्याची वेळ हडोळतीच्या ७५ वर्षीय शेतकरी अंबादास पवार यांच्यावर ओढावली. त्याचा व्हिडिओ प्रसारमाध्यमांत व्हायरल आणि विविध दैनिकात फोटोसह बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर राज्य सरकारला जाग आली आणि राज्य सरकारने त्यांना ४० हजाराची मदत देऊन दखल घेतली. जर सरकार खांद्यावर नांगर घेऊन शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचीच दखल घेत असेल तर प्रत्येक शेतकऱ्याने खांद्यावर जोखड घेऊनच शेती करायची का ? असा सवाल करत लातुर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील धानोरा बुद्रुक येथील सहदेव होनाळे हे शेतकरी दि.४ शुक्रवार पासुन



खांद्यावर नांगर घेऊन पायी मुंबईच्या विधानभवनाकडे निघाले आहेत.

काल दि.६ रविवार रोजी लिंबागणेश येथे मुक्कामी होते. आज सकाळी सोमवार रोजी लिंबागणेश येथील ग्रामस्थांनी त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करत त्यांच्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी यश मिळो असा शुभेच्छा देत पाठिंबा दिला. यावेळी डॉ.गणेश ढवळे, राम फाळके, हरिओम क्षीरसागर, सुनिल ढवळे, समीर शेख, लहु घोलप, चेतन कानिटकर, नवनाथ बोराडे, अर्जुन घोलप, खंडु वाणी आदी ग्रामस्थ हजर होते.

सहदेव होनाळे पदवीधारक आहेत, कुटुंबात आई, पत्नी, भाऊ, मुलांसह एकुण १३ जण आहेत. ३ भावंडात एकुण साडे ९ एकर शेती आहे. त्यांच्यावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. शेतीमालाला भाव नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात आहे. सरकारकडुन कर्जमाफी दिली जात नाही. आधारभुत किंमत योजनेसाठी नोंदणी करूनही बहुतांश शेतकऱ्यांच्या मालाची खरेदी केली जात नाही. मनरेगा अंतर्गत कामाचे पैसे मिळत नाही, एक रुपयात पिक विमा योजना सरकारने गुंडाळली आहे. मागील २-३ वर्षातील पिक विमा अजुन मिळाला नाही, सरकार शेतकरी विरोधी धोरणे राबवत असुन सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण अशी उद्विग्न प्रतिक्रिया त्यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी चर्चा करताना दिली.

## श्री क्षेत्र नारायण गड येथे १२६० भक्तांची भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



बीड । प्रतिनिधी

विठूनामात आरोग्यसेवा नारायण गडावर श्रद्धेची व सेवाभावाची गंगा आषाढी एकादशीनिमित्त जिज्ञासा व मेडिव्हिजन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र नारायण गड येथे मोफत आरोग्य तपासणी व दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन खलापुरी गावाचे सरपंच मा. गणेश घोलप, डॉ. मंगेश आधारे, बीड विभाग संघटनमंत्री ज्ञानेश्वर उद्देवाल व सहमंत्री आशीष वारे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

या आरोग्य शिबिरात २२ डॉक्टरांच्या सेवेमुळे १२६० भाविक भक्तांची आरोग्य तपासणी, बीपी तपासणी व दंत तपासणी, जनरल चेकअप करण्यात आले. यासोबतच सर्व तपासणी लाभार्थ्यांना मोफत औषधे व गोळयांचे वाटप करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राघवेंद्र कुलकर्णी, पवन बांगर, स्वानंद गाडगे, प्रद्युम्न परजने, प्रणव तवार, धनंजय मुटकुळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. हे शिबिर आरोग्यसेवा व सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त व समाधानकारक ठरले.

## सुनिल सूर्यवंशी याच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थांना शालेय साहित्य वाटप

दौलावडगाव । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कामाची आवड असलेल्या व ती




जपण्यासाठी अहोरात्र धडपड करत लोकांचे मोठे जाळे निर्माण करून गावासह, परिसरातील लोकांच्या अडचणी सोडवण्यासाठी सदैव कामात सक्रिय असलेल्या सुनिल सुर्यवंशी याचा वाढदिवस विविध उपक्रमाने सोमवारी साजरा करण्यात आला. शालेय विद्यार्थांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. आष्टी तालुक्यातील केरूळ येथील माजी सरपंच व अंबिका लॉन्स चे मालक सुनिल सुर्यवंशी याचा सोमवारी ५० वा वाढदिवस साजरा करण्यात आला. वाढदिवस म्हटले की वारेमाप खर्च केला जातो.पण या खर्चाला फाटा देऊन गावातील जि.प.शाळेतील विद्यार्थी सोबत वाढदिवस साजरा करत खाऊचे व शालेय साहित्यांचे वाटप केले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ मोठ्या संख्खेने उपस्थित होते.



सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ कार्यालयात बदामराव पंडित यांचे खंदे समर्थक संदीप वाल्हेकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन सत्कार करताना महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ संपादक दीपक थोरात, निवासी संपादक उद्धव आरे, महादेव वाघमारे, संचार उमाप, काशिनाथ आढागळे, प्रकाश धुताडमल सर्वजण उपस्थित होते.

## सिताचंद्र प्रतिष्ठानकडून डॉ. दीपा क्षीरसागरांचा गौरव

बीड । प्रतिनिधी

गेली पाच-सहा दशकापासून बीड शहराच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, राजकीय क्षेत्रात तन-मन-धनाने काम करणाऱ्या डॉ.दीपाताई क्षीरसागर यांचा सिताचंद्र ऑडिओ ड.ग्रुपच्यावतीने गौरव करण्यात आला. बीड जिल्हा हा कलावंतांचा जिल्हा आहे हे सर्व महाराष्ट्राला श्रुत आहे. त्या कलावंतांच्या भूमीमध्ये उदयोन्मुख कलावंतांना मुंबई, पुणे, कोल्हापूर सह विविध सांस्कृतिक शहरात व्यासपीठ



निर्माण करून देणाऱ्या आणि सातत्याने प्रयत्नशील असणाऱ्या अखिल भारतीय नाट्य परिषद बालरंग भूमी परिषद आणि बीड नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्ष डॉ दीपाताई क्षीरसागरांचा सौ.केशरबाई सोनाजीराव शिरसागर अखिल भारतीय नाट्य परिषद आणि बालरंग भूमी परिषद यांनी आयोजित केलेल्या अभंगवाणी या भक्ति प्रधान संगीतमय कार्यक्रमांमध्ये शुभकार्यास मात्र मुग्ध करणाऱ्या आशयघन उजवी आवाजात निवेदनासह सर्व व्यवसायाच्या जाहिराती करणाऱ्या सिताचंद्र ऑडिओ ऍडव्हर्टाईजच्यावतीने महाराष्ट्राच्या पालखी सोहळ्याच्या क्षणांनी सजवलेल्या छायाचित्रावर डॉ.सौ दीपाताई क्षीरसागर यांच्या कर्तृत्वाचा ठसा अक्षरांनी चित्रित केलेली फ्रेम देऊन गौरव करण्यात आला.

डॉ.सौ दीपाताई क्षीरसागर यांना दिलेली फ्रेम ही निवेदक सुरेश साळुंके यांनी अतिशय कल्पकतेने तयार केली आहे. ज्यामध्ये पालखी सोहळाचा परमोच्च आनंदबिंदू आसलेले रिंगण चित्रित केले आहे.तर त्याच रिंगणामध्ये शांत शितल मृदू भाषीक ओजस्वी प्रतिभा धारण केलेल्या डॉ.दीपाताई क्षीरसागरांचे छायाचित्र चित्रीत केले आहे. त्याच्याच बाजुला डॉ. दीपाताईचे अवघे व्यक्तीमत्व अधोरेखित करणारे निवेदक सुरेश साळुंकेंनी काव्य लिहिले आहे.अभंगवाणी या कार्यक्रमासाठी बीड शहरातील संगीत क्षेत्रामध्ये योगदान देणाऱ्या अनेक संगीत क्लासचे संचालक, बालगायक आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

या क्षणी बोलताना डॉ.सौ.दीपाताई क्षीरसागर म्हणाल्या, मला जे मिळालं ते माझ्याकडे राहू नये ते समाजामध्ये निरंतर वाहत रहावे या भावनेने मी काम करत आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातुन मिळणारा आनंद आणि ऊर्जा हि अलौकिक आहे. माझे सर्व सांस्कृतिक, धार्मिक, अध्यात्मिक कार्याचे वर्णन करणारा हा माझा गौरव मी माझे स्वर्गीय आई-वडीलांसह आईवडिलतुल्य काकू-नानांना समर्पित करते. निवेदक सुरेश साळुंके यांनी माझ्या आई-बाबांचे सुहासिनी आणि यशवंत हे शुभंकर नाव कवितेत अतिशय चपखलपणे मडवले आहे याचा माला आनंद आहे. तर कवितेत अधोरेखित केलेला योगेश-पुजा.... मी तुमच्यामुळे आई झाले हा माझा कृतज्ञभाव सुखावणारा आहे. कार्यक्रमासाठी प्राचार्य शिवानंद क्षीरसागर, सुरश्री भरत लोळगे, डॉ.संजय पाटील, नामदेव साळुंके, अनिता शिंदे, राहुल सोनवणे, दीपक जमदाडे, विजय राख, सुरेश थोरात, दुष्यंत रामटेके, गुलाबताई लोळगे, विवेक काटे, महेश कुलकर्णीसह बीड शहरातील अनेक जेष्ठ श्रेष्ठ गायक कलावंत उपस्थीत होते.

## धारूरच्या मुख्य बाजारपेठेतील नव्या रस्त्याचे काम खुलेआम बोगस सुरू

### बांधकाम विभाग अधिकाऱ्यांचे स्वतःच्या विकासासाठी कामाकडे दुर्लक्ष?

धारूर । प्रतिनिधी

शहरात मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यांचे सिमेंट- कॉँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. रस्त्यांचे कॉँक्रीटीकरण करण्यात येत आहे. या मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असून, याकडे बांधकाम विभाग धारूर उपविभागीय उपअभियंता सचिन कांबळे यांच्यासह सा.बा विभागाचे अधिकारी यांनी गुत्तेदाराशी संगणमत करून धारूरकरांचे स्वप्न असलेला रस्त्यात बोगसगिरीचा सपाटा चालू असल्याचे नागरिकात बोलले जात आहे, मात्र सिमेंट कॉँक्रीटचा रस्ता तयार करताना प्रथम आवश्यक ते खोदकाम करून त्यामध्ये चार इंच जाडीच्या दगडांचा अर्धा फूट थर टाकून त्यावर थोडा मुरूम टाकून रोड रोलरने दबाई करावी लागते. नंतर त्यावर सिमेंट कॉँक्रिटीकरणाचा थर टाकण्यात येतो, परंतु, असे न करता, पहिलाच डांबरी रस्त्याला टोकरून, खोदकाम न करता माती मिश्रित कपचीचा वापर करण्यात येत आहे, हा सर्व प्रकार बांधकाम विभाग धारूर मधील उपअभियंता



सचिन कांबळे, अरुण मुंडे, व्यंकटेश भांबरे या अधिकाऱ्यांना माहित असताना, त्यांना होत असलेला बोगस रस्ता डोळ्यात माती गेल्यामुळे दिसना की काय..? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. रात्रीच्या अंधारात गुत्तेदाराने काम उरकण्याचा सपाटा लावला आहे. यामुळे होणारे रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे नागरिकांकडून बोलले जातात आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ रस्त्यांचे काम सुरू झाले आहे.

शहरातील रस्त्याच्या विकासकामांना सुरुवात झाली आहे. परंतु, या कामांचा दर्जा निकृष्ट असून, त्यात भ्रष्टाचार होत असल्याची नागरिकांमध्ये चालू आहे. धारूर शहरांमध्ये व्यापारी नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर छत्रपती शिवाजी महाराज, चौक काशिनाथ चौक, तसेच हनुमान मंदिराकडे जाणारा मुख्य रस्त्याचे काम सध्याला सुरू आहे. पहिलाच डांबरी रस्त्याला टोकरून त्यावर माती मिश्रित कपचीचा वापर करण्यात येत आहे. रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. परिणामी, रस्त्याचे काम निकृष्ट होत आहे, या कामाकडे जिल्हाधिकारी यांनी वेळीच लक्ष देऊन भ्रष्टचार मोडीत आणून शहरातल्या नागरिकांच्या म्हणण्याप्रमाणे संबंधित गुत्तेदारसहीत अभियंत्यावर इंजिनीयर यांच्यावर कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT